Literacy for a Billion

Movie: Hello Jai Hind
Year: 2011

Song: Ganjlelya Sawalila
Lyricist:

गंजलेल्या सावलीला खेद खंत नाही
गंजलेल्या सावलीला खेद खंत नाही
थांबलेला जन्म त्याला आधी अंत नाही
जडावल्या पावलांना कुठवर ओढू
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
गंजलेल्या सावलीला खेद खंत नाही

कसा देवबाप्पा डाव अर्ध्यामध्ये मोडला
भरल्या गर्दीत माझा हात का रे सोडला
हरवलो माझ्यापाशी तुझा ठाव नाही
हरवलो माझ्यापाशी तुझा ठाव नाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
गंजलेल्या सावलीला खेद खंत नाही
थांबलेला जन्म त्याला आधी अंत नाही

भिडलो जगाला जरी जिंकल्या लढाया
स्वतःशीच लढण्यात जन्म जाई वाया
जगावे लागेल तू रे मरू दिले नाही
जगावे लागेल तू रे मरू दिले नाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
मीच माझे ओझे आणि मीच भार वाही
गंजलेल्या सावलीला खेद खंत नाही

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*